# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स : २२६९२१०२/२२६९०००७.

तार - EDUTECH E-mail : desk4a@dte.org.in Internet :http/www.dte.org.in

**परिपत्रक** क्र. ४-अ/आस्था/२०१०/बदली/४२४

**कालमर्यादा दि.०२.०३.२०१०** दिनांक : १७ फेब्रुवारी २०१०

**प्रति,**

१) उपसचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर.

२) प्राचार्य,
सर्व शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था

**विषय :- शासकीय सेवकांच्या नियतकालीक बदल्यांबाबत...**

संदर्भ :- शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध करण्याकरीता सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१.

शासकीय सेवकांच्या नियतकालीक बदल्यांसदर्भात संदर्भांकित परिपत्रकान्वये शासनाने बदल्यांचे धोरण जाहीर केले असून, बदल्यांच्या धोरणानुसार **दिनांक ३१.०३.२०१०** पर्यंत एकाच ठिकाणी किंवा एकाच पदावर ३ वर्ष सेवा पूर्ण करणारे अध्यापक बदलीस पात्र असल्यामुळे संदर्भातील आपल्या तंत्रनिकेतनांतील अध्यापकांची माहिती सोबतच्या **अ ब क ड ई** विहित प्रपत्रात खालील सुचना विचारात घेऊन सादर करण्यात यावी. दिनांक ३१.०३.२०१० रोजी एकाच ठिकाणी/एकाच पदावर ३ वर्ष सेवा पूर्ण करणा-या शासकीय तंत्रनिकेतनातील प्राचार्य / विभाग प्रमुख तत्सम / अधिव्याख्याता यांची माहिती सोबतच्या विहित प्रपत्रात excel sheet मध्ये DV-TTNatraj या फॉन्टमध्ये तयार करुन dte_4a@rediff.com या पत्यावर मेल करावी.

१) बदलीसाठी संबंधितांना वैयक्तीक पसंतीचीा ३-४ ठिकाणे कळविण्याची सूचना देऊन त्याप्रमाणे माहिती सादर करण्यात यावी. मात्र ज्या अध्यापकांनी बदलीसाठी पसंतीची ठिकाणे दिली नाहीत त्यांची बदली प्रशासकीय दृष्टीने इतरत्र करण्यात येईल याची त्यांना जाणीव करुन द्यावी.

२) शासन धोरणानुसार पती-पत्नी दोघे शासन सेवेत असल्यास व त्यांची एकाच ठिकाणी बदली करावयाची असल्यास, संबंधित जेथे कार्यरत आहेत त्या कार्यालयाचे ते कार्यरत असल्याबद्दलचे संबंधित कार्यालय प्रमुखांचे प्रमाणपत्र लेखी स्वरुपात पुरावा म्हणून सादर करण्यात यावेत.

३) ***आपल्या तंत्रनिकेतनांत/कार्यालयात कार्यरत असलेल्या अध्यापकांपैकी ज्या अध्यापकांच्याबाबतीत विद्यार्थ्यांच्या तक्रारी आहेत अथवा त्यांचा शैक्षणिक संपादणुक अहवाल प्रतिकुल आहेत अशा अध्यापकांची नांवे सुध्दा कळवुन त्यांची बदली करणे आवश्यक आहे किंवा कसे? याबाबत आपले स्पष्ट अभिप्राय कळविण्यात यावेत.***

४) संदर्भीय शासन परिपत्रकात दिलेल्या सर्व तरतूदी विचारात घेण्यांत येवून त्या अनुषंगाने प्रस्ताव दिल्याचे प्रमाणित करावे.

५) ज्या अध्यापकांना विनंती बदली हवी असल्यास त्यांचे अर्ज नव्याने प्राचार्यांच्या शिफारशीसह एकत्रितपणे सादर करणे आवश्यक राहिल. सदर अर्जात संबंधितांची जन्मतारीख नमुद करणे आवश्यक आहे.

६) जे अध्यापक नजिकच्या कालावधीत सेवानिवृत्त होत आहेत अशा अध्यापकांच्या नांवासमोर ठळक अक्षरात अभिप्राय देणे आवश्यक आहे.

७) जे अध्यापक अपंग आहेत अथवा ज्यांची मुले अपंग आहेत अशा अध्यापकांनी तसा पुरावा प्राचार्यांकडे सादर करावा तसे प्राचार्यांनी अभिप्रायामध्ये नमुद करावे.

८) ज्या अध्यापकांनी आई वडिलांचे, मुलांचे, पत्नीचे आजारपणासाठी बदलीची विनंती केली असेल अशा अध्यापकांना वैद्यकीय कागदपत्रे पुरावा म्हणून देणे आवश्यक आहे.

९) जे अध्यापक पीएचडी / एम ई / एम टेक या अभ्यासक्रमासाठी गेले असल्यास त्यांच्या नावासमोर ते ज्या कालावधीसाठी गेले आहेत तो कालावधी नमुद करावा. ( जाण्याची तारीख व परत येण्याची अपेक्षित तारीख नमुद करणे आवश्यक )

१०) ***जे अध्यापक बदलीसाठी राजकीय दबाव आणतील अशा अध्यापकांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल ही बाब आपल्या संस्थेतील अध्यापकांच्या निदर्शनास आणावी***

११) विनंती बदली करीता असलेले अर्ज प्राचार्य/ विभागीय कार्यालय यांचे मार्फतच सादर करावेत. थेट सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही याची संबंधितांना जाणीव करुन द्यावी.

१२) या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, संस्था प्रमुखांनी शिफारशीसह सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने बदल्याबाबत निर्णय घेतल्यानंतर बदली केलेल्या काही अध्यापकांची बदली रद्द करण्याबाबत संस्थाप्रमुखांकडून विनंती करण्यात येते. म्हणून याबाबत आपणांस सुचित करण्यात येते की, संदर्भीन बदल्यांच्या कायद्याचे अवलोकन करुन बदलीपात्र अध्यापकांची बदली करावयाची नसल्यास त्याचे समर्थन आवश्यक त्या कागदपत्रासह देऊन तशी शिफारस करण्यात यावी, याबाबत बदल्या झाल्यानंतर आपल्याकडून कोणतीही शिफारस आल्यास विचारात घेतली जाणार नाही.

१३) संदर्भीन अधिनियमात दिलेल्या सर्व तरतूदी विचारात घेण्यात येऊन त्या अनुषंगाने बदल्याची माहिती दिल्याचे तसेच सोबतच्या विवरणपत्रातील माहिती अचूक व सत्य असल्याचे आपण प्रमाणित करुन द्यावे.

तरी, आपणांस कळविण्यात येते की, संदर्भीन अधिनियमातील सुचना विचारात घेऊन आपल्या तंत्रनिकेतनांत/कार्यालयात दिनांक ३१.०३.२०१० रोजी एकाच ठिकाणी/एकाच पदावर ३ वर्ष सेवा पूर्ण करणा-या अध्यापकांची माहिती सोबतच्या विहित प्रपत्रात भरुन या कार्यालयास दिनांक ०२.०३.२०१० पूर्वी निश्चितपणे पाठविण्यात यावी. तसेच संस्थेत दिनांक ३१.०१.२०१० पर्यत मंजूर, रिक्त व भरलेली पदे तसेच भरलेल्या पदावर कोणते अध्यापक कार्यरत आहेत त्या अध्यापकांची माहिती सोबतच्या विवरणपत्र क मध्ये सादर करावी. जे अधिव्याख्याते न्यायालयीन आदेशानुसार तसेच कंत्राटी, ऑनलाईन पध्दतीने कार्यरत आहेत त्यांची नांवे ठळक रित्या दर्शविण्यात यावी. सदरची माहिती अचूक असणे आवश्यक आहे. जर सदरची माहिती चूकीची आढळल्यास संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना जबाबदार धरले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच सदरचे परिपत्रक या संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**(डॉ सु का महाजन)**
**प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई**

**प्रत :**

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, त्यांच्या कार्यकक्षेतील संस्थाप्रमुखांनी सादर केलेली नियतकालिक बदल्यांची माहिती सोबतच्या अ ब क ड इ प्रपत्रात भरुन आपल्या शिफारशीसह दिनांक ०२.०३.२०१० पर्यंत सादर करावी.

२) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
त्यांना कळविण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील विभागीय कार्यालयातील कार्यालय प्रमुखांनी सादर केलेली नियतकालिक बदल्यांची माहिती तपासून सोबतच्या अ ब क ड इ प्रपत्रात भरुन आपल्या शिफारशीसह दिनांक ०२.०३.२०१० पर्यंत सादर करावी.

# प्रपत्र अ

शासकीय तंत्रनिकेतनातील प्राचार्य / विभाग प्रमुख / अधिव्याख्याता व तत्सम पदावर कार्यरत अधिका-यांच्या सन २०१०-२०११ नियतकालिक बदल्यांची माहिती (दिनांक ३१.०३.२०१० पर्यंत **बदलीपात्र असलेले** अध्यापक / अधिकारी )

| अ क्र | अध्यापकाचे / अधिका-याचे नाव | पदनाम | सध्या कार्यरत संस्थेचे नाव | सध्याच्या संस्थेतील कार्यरत दिनाक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील एकूण सेवाकालावधी (३१.०३.२०१० पर्यंत) | जन्मतारीख | सेवा - निवृत्तीचा दिनांक | बदलीस वैयक्तीक पसंतीचे ठिकाण | विविध पदावर विविध ठिकाणी केलेल्या सेवेचा तपशील | | | | विनंती बदलीसाठी अर्ज केल्यास बदलीचे ठिकाण | विनंती बदलीचे कारण | तक्रार असल्यास अभिप्राय | पी एच डी / एमई / एम टेक चा कालावधी (अभ्यासक्रमास गेल्याची व येण्याची अपेक्षीत तारीख ) | सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ मधील तरतूदीच्या अनुषंगाने संस्था प्रमुखांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | संस्थेचे नाव | पदनाम | कालावधी (पासून - पर्यंत) | एकूण कालावधी | | | | | |

❖ प्राचार्य / विभाग प्रमुख / अधिव्याख्याता व तत्सम या पदांची माहिती वेगवेगळया प्रपत्रात देण्यात यावी (न्या हंगामी अधिव्याख्यात्यांची माहिती वेगळया प्रपत्रात देण्यात यावी )

# प्रपत्र ब

शासकीय तंत्रनिकेतनातील प्राचार्य / विभाग प्रमुख / अधिव्याख्याता व तत्सम पदावर कार्यरत अधिका-यांची माहिती (दिनांक ३१.०३.२०१० पर्यंत **बदलीपात्र नसलेले** अध्यापक / अधिकारी )

| अ क्र | अध्यापकाचे / अधिका-याचे नाव | पदनाम | सध्या कार्यरत संस्थेचे नाव | सध्याच्या संस्थेतील कार्यरत दिनाक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील एकूण सेवाकालावधी (३१.०३.२०१० पर्यंत) | जन्मतारीख | सेवा - निवृत्तीचा दिनांक | विविध पदावर विविध ठिकाणी केलेल्या सेवेचा तपशील | | | | विनंती बदलीसाठी अर्ज केल्यास बदलीचे ठिकाण | विनंती बदलीचे कारण | तक्रार असल्यास अभिप्राय | पी एच डी / एमई / एम टेक चा कालावधी (अभ्यासक्रमास गेल्याची व येण्याची अपेक्षीत तारीख ) | सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ मधील तरतूदीच्या अनुषंगाने संस्था प्रमुखांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | संस्थेचे नाव | पदनाम | कालावधी (पासून - पर्यंत) | एकूण कालावधी | | | | | |

❖ प्राचार्य / विभाग प्रमुख / अधिव्याख्याता व तत्सम या पदांची माहिती वेगवेगळया प्रपत्रात देण्यात यावी (न्या हंगामी अधिव्याख्यात्यांची माहिती वेगळया प्रपत्रात देण्यात यावी )

## प्रपत्र क

### शासकीय तंत्रनिकेतनातील कार्यरत असलेल्या कंत्राटी अधिव्याख्यात्यांची माहिती (दिनांक ३१.०३.२०१० पर्यंत **बदलीपात्र** )

| अ क्र | अध्यापकाचे / अधिका-याचे नाव | पदनाम | सध्या कार्यरत संस्थेचे नाव | सध्याच्या संस्थेतील कार्यरत दिनाक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील एकूण सेवाकालावधी (३१.०३.२०१० पर्यंत) | जन्मतारीख | सेवा समाप्तीचा दिनांक | विविध पदावर विविध ठिकाणी केलेल्या सेवेचा तपशील | | | | विनंती बदलीसाठी अर्ज केल्यास बदलीचे ठिकाण | विनंती बदलीचे कारण | तक्रार असल्यास अभिप्राय | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | संस्थेचे नाव | पदनाम | कालावधी (पासून - पर्यंत) | एकूण कालावधी | | | | |

## प्रपत्र ड

### शासकीय तंत्रनिकेतनातील कार्यरत असलेल्या कंत्राटी अधिव्याख्यात्यांची माहिती (दिनांक ३१.०३.२०१० पर्यंत **बदलीपात्र नसलेले** )

| अ क्र | अध्यापकाचे / अधिका-याचे नाव | पदनाम | सध्या कार्यरत संस्थेचे नाव | सध्याच्या संस्थेतील कार्यरत दिनाक | सध्या कार्यरत असलेल्या संस्थेतील एकूण सेवाकालावधी (३१.०३.२०१० पर्यंत) | जन्मतारीख | सेवा समाप्तीचा दिनांक | विविध पदावर विविध ठिकाणी केलेल्या सेवेचा तपशील | | | | विनंती बदलीसाठी अर्ज केल्यास बदलीचे ठिकाण | विनंती बदलीचे कारण | तक्रार असल्यास अभिप्राय | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | संस्थेचे नाव | पदनाम | कालावधी (पासून - पर्यंत) | एकूण कालावधी | | | | |

# प्रपत्र ई

महाराष्ट्र तंत्रनिकेतन, शिक्षक सेवा गट-अ या संवर्गातील शिक्षकीय पदावर कार्यरत असलेल्या अध्यापकांची माहिती दर्शविणारे विवरणपत्र

संस्था / कार्यालयाचे नाव

| **पदनाम** | **मंजूर पदे** | **भरलेली पदे** | | | | **रिक्त पदे** | **भरलेल्या पदावर सध्या कार्यरत असलेल्या अधिका-यांची नावे** | | | **अभिप्राय** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **नियमित** | **न्यायालीयीन हंगामी** | **कंत्राटी** | **एकूण** | | **नियमित** | **न्यायालीयीन हंगामी** | **कंत्राटी** | |

( दिनांक ३१.०१.२०१० पर्यंत विविध शासन निर्णयान्वये मंजूर झालेल्या पदांचा समावेश करणे आवश्यक आहे)